# शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर
## विशेष कक्ष
## परिपत्रक क्र. ०५/२०२६

**विषय — विद्यापीठ संलग्नित अनुदानित महाविद्यालये/शैक्षणिक संस्था यांमधील सहाय्यक प्राध्यापक/शारीरिक शिक्षण संचालक/ग्रंथपाल या संवर्गातील शिक्षकीय पदांच्या भरतीकरिता प्राथमिक बिंदूनामावली तपासणी व समांतर आरक्षण प्रमाणित करणेबाबत द्वितीय शिबीर आयोजित करण्याबाबत.**

**संदर्भ —**

१. शासन निर्णय क्रमांक : बीसीसी-२०२१/प्र.क्र.३८७/१६—ब(ए), दि.०६/०७/२०२१.
२. शासन निर्णयक्रमांक : आढावा-१५१३/प्र.क्र.१२५(भाग-८)/म.शि.५, दि.१२/११/२०२१.
३. शासन निर्णय क्रमांक : बीसीसी-२०१६/प्र.क्र.२२८ए/१८/१६-ब, दि.२५/०२/२०२२.
४. महाराष्ट्र शासन अधिसूचना : दि.०७/०४/२०२२
५. शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण-२०१९/प्र.क्र.९४/१९/विशि-१, दि.११/०४/२०२२
६. उच्च व तंत्र शिक्षण विभाग — शासन निर्णय क्रमांक : १५१३/प्र.क्र.१२५(भाग—८) म.शि.५, दि. २५ मार्च, २०२३
७. उच्च व तंत्र शिक्षण विभाग — शासन शुध्दीपत्रक क्रमांक : आढावा—१५१३/प्र.क्र. १२५(भाग—८)म.शि.५, दि. २७ मार्च,२०२३
८. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक : बीसीसी.२०२४/प्र.क्र.७५/१६—क, दि.२७/०२/२०२४.
९. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक : बीसीसी.२०२१/प्र.क्र.७७/१६—क, दि.०६/०३/२०२४.
१०. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय मुंबई यांचे क्रमांक :— संकीर्ण—२४०२/ई—७४४८६८/विशि—१, दि. ०४ मार्च, २०२४ रोजीचे पत्र.
११. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय मुंबई यांचे क्रमांक :— संकीर्ण—२४०२/ई—७४४८६८/विशि—१, दि. ११ मार्च, २०२४ रोजीचे पत्र.
१२. विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण), कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांच्याकडून मान्यताप्राप्त अशासकीय अनुदानित महाविद्यालय/शैक्षणिक संस्था यांना ०१/१०/२०२५ च्या विद्यार्थी संख्येवर अनुज्ञेय होणारी सहाय्यक प्राध्यापक/शारीरिक शिक्षण संचालक/ग्रंथपाल या सवंर्गातील पदे वाटप करण्यात आले बाबत प्राप्त होणारे पत्र व त्या प्रत्रामधील सर्व संदर्भ तसेच अटी व शर्ती.
१३. विशेष कक्ष विभागाचे परिपत्रक क्रमांक ०१/२०२६, जा. क्र. विशेष कक्ष/बिंदूनामावली शिबीर—२०२६/८६, दि. ०४ एप्रिल, २०२६. मधील सर्व व अटी व नियम
१४. विशेष कक्ष विभागाचे परिपत्रक क्रमांक ०२/२०२६, जा. क्र. विशेष कक्ष/बिंदूनामावली शिबीर—२०२६/१००, दि. १७ एप्रिल, २०२६ मधील सर्व व अटी व नियम.
१५. विशेष कक्ष विभागाचे परिपत्रक क्रमांक ०३/२०२६, जा. क्र. विशेष कक्ष/बिंदूनामावली शिबीर—२०२६/१२८, दि. २१ मे, २०२६
१६. प्र.शिक्षण संचालक, उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे क्र. उशिसं/मवि—१/पदभरती/बिंदुनामावली/ई २६९३४५८, दि. १८ मे, २०२६ चे पत्र
१७. विशेष कक्ष विभागाचे परिपत्रक क्रमांक ०४/२०२६, जा. क्र. विशेष कक्ष/बिंदूनामावली शिबीर—२०२६/२४१, दि. ०२ जुलै, २०२६. मधील सर्व व अटी व नियम

सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, उपरोक्त विषयांकित संदर्भ क्रमांक १२ येथिल पत्रानुसार विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण), कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांच्याकडून मान्यताप्राप्त अशासकीय अनुदानित महाविद्यालय/शैक्षणिक संस्था यांना दिनांक ०१/१०/२०२५ च्या विद्यार्थी संख्येवर अनुज्ञेय होणारी सहाय्यक प्राध्यापक/शारीरिक शिक्षण संचालक/ग्रंथपाल या सवंर्गातील पदे वाटप व पदभरतीस मान्यता देण्यात येत आहे. सदर पत्रानुसार महाविद्यालयातील सहाय्यक प्राध्यापक/शारीरिक शिक्षण संचालक/ग्रंथपाल या संवर्गातील रिक्त पदांच्या भरती प्रक्रियेसाठी प्राथमिक बिंदुनामावली तपासणी करणे आवश्यक आहे. या संदर्भात संलग्नित महाविद्यालये/ मान्यता प्राप्त संस्था यांच्या प्राथमिक बिंदुनामावलीची तपासणी करून देण्यासाठी विशेष कक्ष विभागाकडून **<u>व्दितीय बिंदूनामावली तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात येणार आहे.</u>**

तसचे संदर्भ क्र. १६ प्र. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे क्र. उशिसं/मवि—१/पदभरती/बिंदुनामावली/ई २६९३४५८, दि. १८ मे, २०२६ चे पत्रानुसार बिंदूनामावलीची प्राथमिक तपासणी करताना सामाजिक आरक्षणा सोबत समांतर आरक्षण प्रमाणित करणेबाबत कळविण्यात आले आहे. यानुसार विशेष कक्ष विभागाच्या वतीने संदर्भ क्र. १७ नुसार बिंदूनामावलीची प्राथमिक तपासणी करताना सामाजिक आरक्षणा सोबत समांतर आरक्षण प्रमाणित करणेबाबत परिपत्रक क्रमांक ०४/२०२६, जा. क्र. विशेष कक्ष/बिंदूनामावली शिबीर—२०२६/२४१, दि. ०२ जुलै, २०२६ नुसार कळविण्यात आले आहे. सदर परिपत्रकानुसार आपणाकडून निश्चित करून देण्यात आलेप्रमाणे व सादर केलेल्या कागदपत्रानुसार प्रपत्र ब व प्रपत्र क प्रमाणित करून देण्यात येणार आहे.

**तरी, अशासकीय अनुदानित महाविद्यालये/शैक्षणिक संस्था यांनी सहाय्यक प्राध्यापक/शारीरिक शिक्षण संचालक/ग्रंथपाल पद भरतीकरिता प्राथमिक बिदूंनामावली तपासणी च्या अनुषंगाने रिक्त पदाबाबतचे पत्र विभागीय सहसंचालक, कोल्हापूर विभाग, कोल्हापूर या कार्यालयाकडून प्राप्त करून घेऊन त्याची <u>एक प्रत विशेष कक्ष विभागाकडे दि. १८ जुलै, २०२६ अखेर जमा करावी.</u> व्दितीय प्राथमिक बिंदूनामावली तपासणी शिबीराबाबतचे (वेळापत्रक/Time Table) परिपत्रक स्वतंत्ररित्या विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.**

**<u>तेव्हा, प्राथमिक बिंदुनामावलीची तपासणी व समांतर आरक्षण प्रमाणित करणेबाबत पूर्व तयारी करण्याकरिता उपरोक्त संदर्भ क्र. १३ व १७ येथील विशेष कक्ष विभागाचे परिपत्रकानुसार सर्व प्रपत्रे व तद्अनुषंगिक कागदपत्रे तयार करून, संबंधित महाविद्यालये/संस्था यांनी याबाबतचा प्रस्ताव शिबीरावेळी सादर करावयाचा आहे. जेणेकरून पुढील कामकाज करणे सोईचे होईल.</u>**

बिंदूनामावलीची प्राथमिक तपासणी पूर्ण झाल्यानंतर, **सात दिवसात** (संदर्भीय शासन परिपत्रकातील तरतूदीनुसार) विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये/शैक्षणिक संस्था यांनी मा. सहाय्यक आयुक्त, मागासवर्ग कक्ष, (मावक), पुणे यांचेकडून बिंदूनामावली प्रमाणित (**अंतिम तपासणी**) करून घेणेची आहे. याची नोंद घ्यावी.

**संदर्भ : जा.क्र.—विशेष कक्ष/बिंदुनामावली शिबीर—२०२६/**248

**दिनांक :** 08 JUL 2026

**आदेशावरून,**

**उपकुलसचिव,**
**तथा प्राथमिक बिंदुनामावली तपासणी अधिकारी**
**विशेष कक्ष, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर**

**प्रति :—**

**अ.** प्राचार्य/संचालक, शिवाजी विद्यापीठ संलग्नित सर्व अनुदानित महाविद्यालये/शैक्षणिक संस्था.
**ब.** वेब मास्टर, शिवाजी विद्यापीठ विशेष कक्ष लिंकवर प्रसिध्द करणेसाठी